crpc bombay.p... doc- 88

**जिल्हाधिकारी तथा, जिल्हादंडाधिकारी बीड यांचे कार्यालय (गृह विभाग)**

नगर रोड, बीड. ४३११२२

दुरध्वनी क्रं. ०२४४२-२२२६०४ फॅक्स ०२४४२-२२२०११

**क्र.२०२०/आरबीडेस्क-१/पोल-१/कावि-फौप्रसंक१४४** **दिनांक ०९/०७/२०२०.**

**वाचा:** १. आपत्ती व्यवस्थापन कायदा-२००५
२. साथरोग प्रतिबंधात्मक कायदा-१८९७
३. फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३
४. महाराष्ट्र कोवीड-१९ उपाययोजना नियम २०२०
५. महाराष्ट्र महसूल व वनविभाग आपत्ती व्यवस्थापन,मदत व पुर्नवसन यांची अधिसूचना दिनांक १३/०४/२०२०
६. महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्रमांक DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक ०२/०५/२०२०
७. या कार्यालयाचे आदेश क्रमांक २०२०/आरबी/डेस्क१/कावि-१४४ फौप्रसंक१४४ दिनांक ०३/०५/२०२०
८. महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्रमांक DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक १७/०५/२०२०
९. या कार्यालयाचे आदेश क्रमांक २०२०/आरबी/डेस्क१/कावि-१४४ फौप्रसंक१४४ दिनांक १७/०५/२०२०
१०.या कार्यालयाचे आदेश क्रमांक २०२०/आरबी/डेस्क१/कावि-१४४ फौप्रसंक१४४ दिनांक ३१/०५/२०२०
११.महाराष्ट्र शासन यांचे आदेश क्रमांक DMU/2020/CR.92/DisM-1 दिनांक २९/०६/२०२०
१२.या कार्यालयाचे आदेश क्रमांक २०२०/आरबी/डेस्क१/कावि-१४४ फौप्रसंक१४४ दिनांक ३०/०६/२०२०
१३.जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे पत्र क्रमांक दि.०१/०७/२०२०
१४.या कार्यालयाचे आदेश क्रमांक २०२०/आरबी/डेस्क१/कावि-१४४ फौप्रसंक१४४ दिनांक ०१/०७/२०२०
१५.जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे पत्र क्रमांक दि.०९/०७/२०२०

**आदेशः-**

ज्याअर्थी या कार्यालयाचे संदर्भीय आदेश क्र. १२ अन्वये दिनांक ३१ जुलै २०२० रोजीचे रात्री १२.०० पर्यंत फौजदारी प्रक्रिया दंड संहिताचे कलम १४४ (१)(३) लागू करण्यात आले आहेत.

आणि ज्याअर्थी, बीड शहरातील विविध भागात कोरोना विषाणूची लागण (covid-19 Positive) झालेले रुग्ण आढळुन आलेले असल्याने, प्रतिबंधात्मक व्यवस्था अंतर्गत Containment zone जाहीर करावा असा अहवाल जिल्हा आरोग्य अधिकारी, बीड यांनी संदर्भ १३ अन्वये सादर केला होता.

आणि ज्याअर्थी, या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक १४ चे आदेशान्वये बीड शहरात फौजदारी प्रकिया दंड संहीता १९७३ चे कलम १४४ नुसार संचारबंदी/मनाई आदेश लागू करण्यात आले होते.

आणि ज्याअर्थी, जिल्हा आारोग्य अधिकारी,बीड यांनी संदर्भ क्रमांक १५ अन्वये अहवाल सादर करुन बीड शहरामध्ये दिनांक ०१/०७/२०२० ते ०९/०७/२०२० या कालावधीत संपूर्ण शहरामध्ये संचारबंदी लागू करण्यात आलेली होती. सदर प्रतिबंधात्मक व्यवस्था शिथील करुन बीड शहरातील खालील ठिकाणी पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले असून त्या भागामध्ये यापुढे दिनांक १०/०७/२०२० रोजी पासून प्रतिबंधात्मक व्यवस्था कार्यरत करावी असा अहवाल सादर केला आहे.

त्याअर्थी, बीड जिल्हयात इतर ठिकाणी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणुन पुढील प्रमाणे फौजदारी प्रकिया दंड संहीता १९७३ चे कलम १४४ नुसार बीड शहरात खालील दर्शविलेल्या ठिकाणी Containment zone म्हणून घोषित करण्यात येत असून पुढील अनिश्चित कालावधीसाठी पूर्णवेळ बंद करण्यात येवून संचारबंदी लागू करण्यात येत आहे.

| अ.क्र. | रुग्ण पॉझिटिव्ह आढळ्याचा दिनांक | बीड शहरातील भाग | Containment zone | |
|---|---|---|---|---|
| | | | च्या घरापासून | च्या घरापर्यत |
| ०१. | ०४.०७.२०२० | इंद्रप्रस्थ कॉलनी | शेख महेमुद शेख मसुद | शेख ताजोद्दीन |
| ०२. | ०२.०७.२०२० | आसेफ नगर | सय्यद सिराजोद्दीन सय्यद खुदबोधीन | शेख मतीन मोहम्मद उस्मान |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३. | ०७.०७.२०२० | बीड मामला | आयशा किराणा (शेख ईब्राहीम मोहम्मद) | अब्दुल मुजीब अब्दुल वाहेद मोमीन |
| ०४. | ०७.०७.२०२० | औटेगल्ली,थिगळेगल्ली जवळ | अखीलोद्दीन सरदार ईनामदार | विशाल विजयकुमार थिगळे |
| ०५. | ०७.०७.२०२० | पांडेगल्ली बालाजी मंदिराजवळ | गणेश मदनराव बलदावा | बाबुराव माणिकराव धायगुडे |
| ०६. | ०४.०७.२०२० | डीपी रोड, बीएसएनएल ऑफीसच्या जवळ | बारकुल हॉस्पिटल | आजीनाथ नवले |
| ०७. | ०८.०७.२०२० | परवाना नगर, खंडेश्वरी रोड | महारुद्र नागनाथअप्पा माडेकर | श्री दत्त मंदीर पर्यत |
| ०८. | ०८.०७.२०२० | विद्यानगर पश्चिम | घुमरे कॉम्प्लेक्स | |
| ०९. | ०८.०७.२०२० | गोविंदनगर | बळीराज कॉम्प्लेक्स | गोपाळ अपार्टमेंट |
| १०. | ०८.०७.२०२० | मोमीनपुरा | सागर कटपीस सेंटर (रफीक सेट) | फातेमा बुक डेपो (मुफती कौसर सादती) |
| ११. | दि. २९ जून २०२० पासून आजपर्यंत १० रुग्ण | राजूरीवेस ते कोतवाली वेस व आजूबाजूचा परिसर | राजूरीवेस ते कोतवाली वेस व आजूबाजूचा परिसर (कारंजा, अजिजपुरा, बलभीम चौक, छोटीराज गल्ली, काळे गल्ली व जूना बाजार) | |

बीड शहरातील वरील सर्व Containment zone वगळता बीड शहरातील इतर सर्व भागांमध्ये प्रतिबंधात्मक व्यवस्था दिनांक १ जुलै २०२० रोजीच्या या विषयीच्या आदेशापूर्वी जशी होती तशी पूर्ववत करण्यात येत आहे.

सदरचे आदेश आज दिनांक ०९/०७/२०२० रोजी सही शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
(राहूल रेखावार)
जिल्हादंडाधिकारी बीड

**प्रतः**

१. मा. अपर मुख्य सचिव, गृहविभाग (विशेष) महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई यांना माहीतीस्तव सविनय सादर.
२. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. पोलीस अधिक्षक बीड यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड.
५. अधिष्ठाता, स्वामी रामानंद तिर्थ शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय,अंबाजोगाई यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
६. जिल्हा शल्य चिकित्सक, बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
७. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
८. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
९. उपविभागीय दंडाधिकारी बीड, पाटोदा, माजलगांव, परळी, अंबाजोगाई.
१०. कार्यकारी दंडाधिकारी (सर्व) जिल्हा बीड.
११. सहआयुक्त, अन्न व औषध प्रशासन, बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
१२. विभाग नियंत्रक, रा.प.म. बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
१३. व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
१४. जिल्हा प्रशासन अधिकारी (नगर पालिका प्रशासन विभाग) जि.का.बीड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
१५. जिल्हा माहिती अधिकारी बीड यांना माहितीस्तव व स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेसाठी.

11p
09/07/20

जिल्हादंडाधिकारी बीड

जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय बीड